उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
गांवकरी
शनिवार, दि. १५ सप्टेंबर २०१२

# अहमदाबादमध्ये 'ठक्कर्स' भव्य प्रकल्प उभारणार



मुंबई :– नाशिकला आपल्या अनेक नाविन्यपूर्ण प्रकल्पांद्वारे आधुनिक शहराचे रंगरूप देण्यामध्ये मोलाची कामगिरी बजावण्याबरोबरच महाराष्ट्रात धुळे, नागपूर, माणगाव इत्यादी विविध शहरांमध्ये लक्षवेधक व्यापारी संकुले उभारणारी ठक्कर्स डेव्हलपर्स लि. ही कंपनी लवकरच या राज्याची सीमा ओलांडून गुजरातमधील अहमदाबाद शहरात एक भव्य निवासी प्रकल्प उभारणार असल्याचे कंपनीचे अध्यक्ष जितेंद्र ठक्कर यांनी सांगितले.

मुंबई येथील इंडियन मर्चंटस चेंबर येथे आयोजित २५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, संपूर्ण रियल इस्टेट व्यवसाय क्षेत्राला जागतिक आर्थिक मंदीचा फटका बसल्यामुळे या क्षेत्रातील अनेक मोठ्या कंपन्यांच्या कामगिरीवर नकारात्मक परिणाम झाल्याचे दिसत आहे. ठक्कर्स उद्योग समुहाच्या स्थापनेला ५० वर्षे पूर्ण झालेली असतानाच या समूहाची फ्लॅगशिप असलेल्या ठक्कर्स डेव्हलपर्स लिमिटेडला २५ वर्षे पूर्ण झाली आहेत यानिमित्ताने पुढील एका वर्षात एक लाख झाडे लावण्याचा एक व्यापक कार्यक्रम हाती घेण्यात आले असल्याचे ठक्कर यांनी सांगितले. कंपनीच्या भागधारकांनी उत्साहाने हजेरी लावलेल्या या सभेत भागधारकांना १३ टक्के डिव्हिडंड देण्याच्या संचालक मंडळाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येऊन गेल्या वर्षी १२ टक्के डिव्हिडंडपेक्षा हा डिव्हिडंड १ टक्यांनी जास्त असून त्यातून कंपनीची वाढ कशी सकारात्मक होत असल्याचे कंपनीचे भागधारक बाबुलाल पारेख यांनी सांगितले. कंपनीमधील गुंतवणुकीतून गेल्या आर्थिक वर्षात १३.३९ टक्के स्टॉक रिटर्न भागधारकांना मिळाले असून ते इतर अनेक कंपन्यांच्या तुलनेत खूपच आश्वासक असल्याचे राजेश छेडा यावेळी म्हणाले. कंपनीच्या शेअरच्या बाजारातील आजची किंमत १०९.९५ प्रति शेअर इतकी आहे. हे सुध्दा कंपनीच्या कार्यक्षम कामगिरीचे निदर्शक असल्याचे भागधारक सतीश शहा यांनी स्पष्ट केले.